जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि- 11-01-2020
तरुण भारत





कोल्हापूर : या वर्षातील पहिले छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद लुटताना विद्यापीठातील विद्यार्थी.

# चंद्रग्रहणाचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला

प्रतिनिधी
कोल्हापूर

या वर्षातील पहिले छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शाकंभरी पौर्णिमेच्या रात्री लुटला.

कोल्हापुरातून शुक्रवार १० जानेवारीला रात्री १० वाजून ३७ मिनिटांनी या ग्रहणाची सुरुवात झाली. हे ग्रहण छायाकल्प या प्रकारचे होते, या मध्ये पृथ्वीची उपछाया चंद्रावर गेल्याने तो तांबूस रंगाचा दिसला. चंद्रग्रहण पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नाही. त्यामुळे साध्या डोळ्यांनी आणि दुर्बिणीच्या साहाय्याने ही चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद शहरातील नागरिकांनी लुटता. विद्यापीठातील विद्यार्थिनी अवकाश विज्ञान प्रयोगशाळेमध्ये असणाऱ्या १२ इंची दुर्बिणीच्या साहाय्याने निरीक्षण केल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी सांगितले. या ग्रहणाच्या सुरुवातीला चंद्राची तेजस्विता ही –१.१ एवढी होती तर मध्याच्या वेळी –०. १२ एवढ्या कमी तेजस्वीतेने चंद्रबिंब दिसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच यापुढील चंद्रग्रहणे ५ जून, ५ जुलै, ३० नोव्हेंबर आणि १४ डिसेंबर रोजी होतील असेही त्यांनी सांगितले.


या छायाकल्प चंद्र ग्रहणाचा कालावधी हा ४ तास ५ मिनिटे इतका होता, तर चंद्रग्रहणाचा मध्य रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी होता. हे चंद्रग्रहण पहाटे २ वाजून ४२ मिनिटानी सुटले.

# रसाळ यांना 'डॉ. म. सु. पाटील पुरस्कार'

## शिवाजी विद्यापीठाकडून घोषणा; १७ जानेवारीला वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** औरंगाबाद येथील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर नरहर रसाळ यांना शिवाजी विद्यापीठाचा 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' शुक्रवारी जाहीर झाला. ज्येष्ठ लेखक व समीक्षक डॉ. पाटील यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या देणगीतून हा पुरस्कार दिला जाणार आहे. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, त्याचे वितरण शुक्रवारी (दि. १७) होणार



> म. सु. पाटील हे मराठीतील महत्त्वाचे समीक्षक होते. त्यांच्या नावाचा पुरस्कार मला जाहीर झाल्याचा अतिशय आनंद होत आहे. याद्वारे एका मोठ्या समीक्षकाने आपल्या पाठीवर थाप दिली.
>
> **- डॉ. सुधीर रसाळ**

आहे, अशी माहिती प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, मराठी समीक्षाक्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या समीक्षकांसाठी डॉ. पाटील यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या देणगीतून विद्यापीठाने हा पुरस्कार सुरु केला आहे. दर दोन वर्षांनी तो दिला जाणार असून, पहिल्या पुरस्कारासाठी डॉ. रसाळ यांची निवड झाली आहे.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी (दि. १७) दुपारी चार वाजता ज्येष्ठ लेखक वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस, कवयित्री नीरजा प्रमुख उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, नंदकुमार मोरे, अवनिश पाटील उपस्थित होते.

## संजय मंडलिक : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय चर्चासत्राचा प्रारंभ

# अनिश्चिततेच्या वातावरणात राज्यशास्त्र विभागाने मार्गदर्शन करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशात सध्या बहुमताच्या जोरावर लोकशाहीची गळचेपी होत आहे. एकप्रकारची अनिश्चितता, चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजमाध्यमांमुळे वस्तुस्थिती आणि विपर्यास यातील भेद लक्षात न आल्याने गोंधळात भर पडतच आहे. या पार्श्वभूमीवर समाजाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाची आहे, असे प्रतिपादन खासदार प्रा. संजय मंडलिक यांनी शुक्रवारी येथे केले.



**शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटनप्रसंगी खासदार प्रा. संजय मंडलिक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी रवींद्र भणगे, भारती पाटील, डी. टी. शिर्के, प्रमोद पवार, विलास आवारी, बाळासाहेब भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.**

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित ‘राज्यशास्त्रातील समकालीन समस्या’ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र आणि महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या ३७ व्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी खासदार प्रा. मंडलिक म्हणाले, विभागाच्या विद्यार्थ्यांना या परिस्थितीचे योग्य आकलन करता आले, तर त्याचे प्रतिबिंब त्यांच्या अभ्यास, संशोधनात उमटेल. त्यादृष्टिने विभागाने समकालीन समस्यांचा वेध घेऊन एकूणच राजकारणाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, समकाळात तर डिजिटल पॉलिटिक्स ते ॲनालिटिक्स, अशी माहिती संवाद तंत्रज्ञानाची जोड देऊन राज्यशास्त्र विषयाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. बदलत्या काळात राज्यशास्त्राची जबाबदारी आणखी वाढत आहे. यावेळी अधिवेशनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संमेलनाध्यक्ष डॉ. विलास आवारी, राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य प्रमोद पवार उपस्थित होते. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले.

### कायद्याचा अभ्यास सोडून ‘राज्यशास्त्र’ला प्रवेश घेतला

विद्यापीठीय राजकारणात स्टुडंट कौन्सिलच्या माध्यमातून प्रवेश करण्यासाठी म्हणून कायद्याचा अभ्यास सोडून राज्यशास्त्र विभागात प्रवेश घेतला. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम सुरुच ठेवले. येथील शिक्षकांनी अभ्यासाची कास मला सोडू दिली नाही. पहिल्या वर्षी ‘बी’ प्लस एका टक्क्याने हुकला. दुसऱ्यावर्षी तो मिळविण्यासाठी डी. यु. पवार, शिवाजीराव मोरे, आदी शिक्षकांचे प्रोत्साहन मिळाले. त्यांच्यामुळे माझ्यासह जयंत पाटील, वैभव नायकवडी, रवींद्र भणगे हे प्राध्यापक होऊ शकले. याच कालखंडात आमची राजकीयदृष्टिने शैक्षणिक जडणघडण झाली. येथील मार्गदर्शनामुळेच सहकार, समाजकारण, राजकारणामध्ये यशस्वी होऊ शकलो.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'जुगाड' आणि 'श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता' या पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून रघुनाथ कडाकणे, रणधीर शिंदे, अण्णासाहेब खेमनर, किरण गुरव, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

# साहित्यिकाच्या सर्जनशीलतेतून वाचकाला वास्तवाची जाणीव : सप्रे

## 'जुगाड', 'श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता'चे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** साहित्यिक त्याच्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून आभासी दुनियेच्या पलीकडील वास्तवाची जाणीव वाचकाला करून देत असतो. 'जुगाड' आणि 'श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता' या दोन्ही साहित्यकृती त्या वास्तवाशी नाते सांगणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या कार्यक्रमात किरण गुरव यांच्या 'जुगाड' (द्वितीय आवृत्ती), डॉ. रघुनाथ कडाकणे यांच्या 'श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता' या पुस्तकांचे प्रकाशन केले. भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, तर राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य अण्णासाहेब खेमनर प्रमुख उपस्थित होते. सप्रे म्हणाले, 'जुगाड'मधून सामाजिक सद्यःस्थितीची जाणीव होते. 'श्वासोच्छ्वासांच्या मध्यंतरातील कविता' हीसुद्धा जीवनाच्या विविध टप्प्यांवर अनुभवास येणाऱ्या सामाजिक, मानसिक आंदोलनांची जाणीव करून देते. यावेळी खेमनर, कादंबरीकार गुरव, कवी कडाकणे, गौरावती खराडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर, आदी उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, राजेश पाटील यांनी आभार मानले.

### चांगले द्योतक

डॉ. शिंदे म्हणाले, मराठी साहित्य लेखनासाठी कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या शाखेची आवश्यकता नसते. अतिशय संवेदनशीलपणे मांडणी करणारे आणि साक्षेपी वेध घेणारे कादंबरीकार निर्माण होत आहेत, हे चांगले द्योतक आहे.

# जाणून घेऊया दुर्मिळ वनस्पती

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विभागाने विकसित केलेल्या दुर्मिळ आणि औषधी वनस्पतींच्या बॉटॅनिकल गार्डन येथे महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने सोमवारी (ता. १२) सकाळी अकरा वाजता 'वॉक थ्रू लिड बॉटॅनिकल गार्डन' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. 'मटा' चे वाचक, बॉटनीचे विद्यार्थी, युवक आणि विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.

वनस्पती विभागाने ४२ एकरमध्ये दुर्मिळ वनस्पती रुजवून विकसित केल्या आहेत. त्यामध्ये सेक्शन प्लँट, फॅमिली मेंबर, हर्बेरियम या विभागात ४० हजार वनस्पतींच्या पेशींचे संवर्धन केले आहे. तसेच काही वनस्पतींसाठी वेगवेगळे प्लॉटस् तयार केले आहेत. नेचे वर्गीय वनस्पतीतील ७८१ तर बुरशी विभागात ५८० जातीच्या वनस्पती आहेत. सपुष्प



## 'मटा'च्यावतीने सोमवारी नेचर वॉक

वनस्पती गटात ८५० प्रकारची झाडे आणि रोपे लावण्यात आली आहेत. आर्किड फुलांची नर्सरी तयार करण्यात आली असून ९० प्रकारांच्या फुलाची रोपे पहायला मिळणार आहेत. तसेच फुलांच्या १८० जातींची झाडे आहेत.

भारतातील सर्व जातींचे पाम एकाच ठिकाणी पहायला मिळणार आहेत. अंदमान निकोबारसह 'सेंच्युरी पाम' या जातीसह ५५ प्रकारची पामची झाडे विकसित करण्यात आली आहेत. त्सुनामीमुळे खारफुटी वनस्पतीला महत्व असून २७ प्रकारच्या वनस्पती तयार करण्यात आल्या आहेत. तसेच गवताचे २० प्रकार पहायला मिळतील. व्हिक्टोरिया लिली हे झाडही पहायला मिळणार आहे.

वनस्पती विभागाने १२ एकर आणि भाषा भवन येथे २० एकरवर उद्याने विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे. विभाग प्रमुख वर्षा जाधव (राठोड) यांच्या नेतृत्वाखाली प्रोफेसर एस.आर. यादव, निरंजना चव्हाण, प्रो. एस.एस. कांबळे, डी.के.गायकवाड, एन.बी. गायकवाड, प्रो. एस.जी घोणे, डॉ. आर.व्ही.गुरव, डॉ. एम.एम. लेखक, डॉ. कल्याणी पवार, डॉ. एम.एस. निंबाळकर यांच्यावतीने नेचर वॉकमध्ये माहिती दिली जाणार आहे. नेचर वॉकमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी सतीश घाटगे (८५५२९६९१९१), अदित्य सरनाईक (९७६७८९०६२६) यांच्याशी संपर्क साधावा.

# शिवाजी विद्यापीठाचा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार डॉ. रसाळ यांना जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. म. सु. पाटील यांच्या नावे देण्यात येणारा पहिला समीक्षा पुरस्कार डॉ. सुधीर रसाळ (औरंगाबाद) यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

मराठी समीक्षा क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या समीक्षकासाठी शिवाजी विद्यापीठाने डॉ. म सु. पाटील समीक्षा पुरस्कार सुरू केला आहे. हा पुरस्कार त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून दिला जात आहे. यावर्षीचा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. रसाळ यांना ज्येष्ठ लेखक व ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते दिला जाणार आहे. दि. १७ रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत.

डॉ. सुधीर रसाळ मराठीतील नामवंत व साक्षेपी समीक्षक आहेत. अर्धशतकाहून अधिक काळ ते समीक्षा लिहीत आहेत. त्यांचे आठ समीक्षा ग्रंथ प्रकाशित आहेत. काव्य समीक्षक अशी त्यांची ओळख असून त्यांनी मराठी मूलभूत स्वरूपाचा समीक्षाविचार मांडला.

याप्रसंगी डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, ज्येष्ठ लेखक डॉ. राजन गवस, कवयित्री नीरजा उपस्थित राहणार आहेत.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. अवनिश पाटील, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पदार्थ विज्ञान विभागाच्या छतावर दुर्बिणीद्वारे चंद्रग्रहण पाहताना विद्यार्थी व इतर. (छाया : नाज ट्रेनर)

# छायाकल्प चंद्रग्रहणाचा विद्यार्थ्यांसह खगोलप्रेमींनी लुटला आनंद

## विद्यापीठ अवकाश संशोधन केंद्रातर्फे ग्रहण पाहण्याची सोय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वर्षाच्या सुरुवातीलाच शुक्रवारी रात्री छायाकल्प चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद खगोलप्रेमी, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी लुटला.

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाच्या छतावरून छायाकल्प चंद्रग्रहण विद्यार्थी व नागरिकांना पाहण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. सूर्यग्रहण झाल्यानंतर साधारणतः पंधरा दिवसांनी चंद्रग्रहण दिसते. चंद्र, पृथ्वी आणि सूर्य सरळ रेषेत आल्यावर चंद्रग्रहण होते. ज्यामध्ये पृथ्वीची सावली ही चंद्रावर पडते व चंद्रग्रहण दिसू लागते.

कोल्हापुरात शुक्रवारी रात्री १० वाजून ३७ मिनिटांनी चंद्रग्रहणास सुरुवात झाली. हे ग्रहण छायाकल्प या प्रकारचे होते. यामध्ये पृथ्वीच्या उपछायेतून चंद्र गेल्याने तो तांबूस रंगाचा दिसला. चंद्रग्रहण पाहताना डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागत नाही, त्यामुळे उघड्या डोळ्यांनी व दुर्बिणीच्या सहाय्याने हे चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद नागरिकांना घेता आला.

भौतिकशास्त्र विभागातील, अवकाश विज्ञान प्रयोगशाळेमध्ये असणाऱ्या १२ इंची दुर्बिणीच्या सहाय्याने विद्यार्थी व नागरिकांनी चंद्रग्रहणाचे निरीक्षण केले. ग्रहणाच्या सुरुवातीला चंद्राची तेजस्विता ही -१.१ ऐवढी होती. मध्याच्यावेळी -०.१२ ऐवढ्या कमी तेजस्वीतेने चंद्रबिंब दिसले. छायाकल्प चंद्र ग्रहणाचा कालावधी ४ तास ५ मिनिटे होता. चंद्रग्रहणाचा रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी मध्य होता. हे चंद्रग्रहण पहाटे २ वाजून ४२ मिनिटांनी सुटले, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि - 11-01-2020

तरूण भारत

# 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' डॉ. सुधीर रसाळ यांना



कोल्हापूर : मराठी समीक्षाक्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या समीक्षकासाठी शिवाजी विद्यापीठाने 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार" सुरू केला आहे. यंदाचा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना जाहीर झाला आहे. रोख ५१ हजार व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण शुक्रवार १७ रोजी सायंकाळी ४ वाजता मुख्य इमारतीमधील राजर्षी शाहू सभागृहामध्ये होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे आहेत. याप्रसंगी साहित्यिक डॉ. राजन गवस, कवयित्री नीरजा उपस्थित राहणार आहेत. सुधीर रसाळ हे मराठीतील नामवंत व साक्षेपी समीक्षक आहेत. त्यांचे आठ समीक्षाग्रंथ प्रकाशित आहेत. व्यक्तिचित्रणात्मक लेखसंग्रह, काही संपादने प्रसिद्ध आहेत. मराठी कवींच्या जाणीवरूपांचा व अभिव्यक्तिवैशिष्ट्यांचा रसाळ यांनी घेतलेला शोध महत्त्वाचा ठरला. त्यांची काव्यस्वरूपमीमांसा हा मराठी समीक्षेतला महत्त्वाचा टप्पा आहे. या वर्षीच्या पुरस्काराची निवड प्रा. राजन गवस, (कोल्हापूर), प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे, (नाशिक) व प्रा. नितीन रिढे मुंबई यांच्या निवड समितीने केली.

# समकालीन राजकीय समस्यांचा विद्यापीठीय व्यवस्थेने वेध घेणे आवश्यक

## खा. संजय मंडलिक; शिवाजी विद्यापीठात राज्यशास्त्र विभागातर्फे चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सद्यस्थितीत राजकीय क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील समकालीन समस्यांचा विद्यापीठीय व्यवस्थेने वेध घेऊन त्या अनुषंगाने संशोधक व विद्यार्थ्यांना अभ्यासाला प्रेरित करावे, नागरिकांना सुजाण बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन खा. प्रा. संजय मंडलिक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'राज्यशास्त्रातील समकालीन समस्या' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद यांचे ३७ वे अधिवेशन अशा संयुक्त समारंभाचे उद्घाटक म्हणून प्रा. मंडलिक बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रा. मंडलिक म्हणाले, सध्या देशभरात एक प्रकारचे अनिश्चिततेचे व चिंतेचे वातावरण आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना खासदार प्रा. संजय मंडलिक. डॉ. रवींद्र भणगे, प्रा. भारती पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, डॉ. विलास आवारी, डॉ. बाळासाहेब भोसले.**

समाजमाध्यमांमुळे वस्तुस्थिती आणि विपर्यास यातील भेद लक्षात न आल्याने गोंधळात भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर समाजाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाची आहे.

विद्यार्थ्यांना परिस्थितीचे योग्य आकलन करता आले तर त्याचे प्रतिबिंब त्यांचा अभ्यास व संशोधनात उमटेल. त्यादृष्टीने विभागाने समकालीन समस्यांचा वेध घेऊन एकूणच राजकारणाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. माध्यमांनी ही परिस्थिती संयमाने हाताळणे गरजेचे आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच सहकार, समाजकारण व राजकारणात यशस्वी होऊ शकलो, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, राज्यशास्त्र एकल पद्धतीने शिकण्याचा अगर शिकविण्याचा विषय नाही. राज्यशास्त्राच्या विविध शाखा अन्य अनेक विषयांना जाऊन मिळाल्या आहेत. समकाळात त डिजिटल पॉलिटिक्स ते ॲनालिटिक्स अशी माहिती संवाद तंत्रज्ञानाची जोड देऊन या विषयाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले.

यावेळी समन्वयक डॉ. भारती पाटील, संमेलनाध्यक्ष डॉ. विलास आवारी, राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य प्रमोद पवार उपस्थित होते.

# संशोधकांनी समस्यांचा वेध घ्यावा

## खासदार प्रा. संजय मंडलिक; शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर : राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेत अध्यक्ष डॉ. विलास आवारी यांच्या सत्कारप्रसंगी मान्यवर

कोल्हापूर, ता. १० : राष्ट्रीय स्तरावरील समस्यांचा वेध घेऊन त्याच्या अभ्यासाकरिता संशोधक व विद्यार्थ्यांना प्रेरित करावे, असे आवाहन खासदार प्रा. संजय मंडलिक यांनी आज येथे केले. बहुमताच्या जोरावर लोकशाहीची गळचेपी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित 'राज्यशास्त्रातील समकालीन समस्या' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे '३७ वे अधिवेशन अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. वि.स. खांडेकर भाषा भवनमध्ये त्याचे आयोजन केले आहे.

प्रा. मंडलिक म्हणाले, "राजकीय जीवनात मिळालेली पदांमागे राज्यशास्त्र अधिविभागाची प्रेरणा आहे. राजकारण व सहकाराचे धडे मला याच विभागात मिळाले. विद्यार्थी चळवळीतून माझ्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळाला. देशातील वातावरण सध्या चिंतेचे आहे. वस्तुस्थिती आणि विपर्यास यातील भेद लक्षात न आल्याने गोंधळात वाढत आहे. ही स्थिती बदलण्यासाठी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. या परिस्थितीचे योग्य आकलन विद्यार्थ्यांनी केले तर त्याचे प्रतिबिंब संशोधनात उमटेल."

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विलास आवारी म्हणाले, "राज्यशास्त्र विषयाला प्राचीन परंपरा आहे. नव्या पिढीने त्यांच्या विकासाचे आकलन करून घ्यावे. राज्यशास्त्र राष्ट्र व राज्यव्यवस्थेशी संबंधित आहे. नव्या अर्थप्रणालीत नव्याने निर्माण होणारे वर्ग, त्यांच्या आकांक्षा, त्यांचे समाज व राजकीय जीवनातील स्थान, त्यांची उपयोगिता व उपद्रवमूल्य यांना लक्षात घेऊन पुढे जावे लागेल."

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "राज्यशास्त्र हा काही एकल पद्धतीने शिकण्याचा अगर शिकविण्याचा विषय नाही. राज्यशास्त्राच्या विविध शाखा अन्य अनेक विषयांना जाऊन मिळाल्या आहेत. समकालात तर डिजिटल पॉलिटिक्स ते ॲनालिटिक्स अशी माहिती संवाद तंत्रज्ञानाची जोड देऊन या विषयाचा अभ्यास होणे आवश्यक आहे."

या प्रसंगी डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य प्रमोद पवार उपस्थित होते. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रविंद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले.

### विभागातून मिळाला आत्मविश्वास

विद्यार्थिदशेतल्या आठवणींना उजाळा देताना प्रा. मंडलिक म्हणाले, "राजकारणातील प्रवेशासाठी कायद्याचा अभ्यास सोडून राज्यशास्त्र विभागात प्रवेश घेतला. इथल्या शिक्षकांनी अभ्यासाची कास सोडू दिली नाही. पहिल्या वर्षी बी प्लस एका टक्क्याने हुकला. दुसऱ्या वर्षी तो प्राप्त करण्यासाठी डॉ. यू. पवार, शिवाजीराव मोरे यांनी प्रोत्साहित केले. राज्यशास्त्र विभागातील आत्मविश्वासामुळेच संसदेत प्रश्न विचारण्याची ताकद निर्माण झाली."


# डॉ. सुधीर रसाळ यांना समीक्षा पुरस्कार जाहीर

## विद्यापीठातर्फे डॉ. म. सु. पाटील पुरस्काराने गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातर्फे पहिला ज्येष्ठ समीक्षक व लेखक डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार औरंगाबादमधील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना जाहीर झाला आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते १७ जानेवारीला विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी चार वाजता तो प्रदान केला जाईल, अशी माहिती प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. मराठी समीक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पुरस्कार दिला जातो. ५१ हजार, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. शिर्के म्हणाले, "'अठ्ठ्याऐंशी वर्षीय श्री. रसाळ मराठीतील नामवंत समीक्षक आहेत. पन्नास वर्षांपासून ते समीक्षा क्षेत्रात कार्यरत असून, त्यांचे आठ ग्रंथ प्रकाशित झाले



डॉ. रसाळ

आहेत. काव्य समीक्षणावर त्यांचे प्रभुत्व आहे. आधुनिक मराठी काव्य परंपरा व कवितेबाबत नवे विचार मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून ते मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाले आहेत. त्यांनी मराठी समीक्षा क्षेत्रात योगदान दिले आहे.''

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील प्रा. राजन गवस, प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे, प्रा. नितीन रिंढे यांच्या निवड समितीने श्री. रसाळ यांची पुरस्कारासाठी निवड केल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी डॉ. विलास पाटील, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

### समीक्षणात भरीव योगदान

डॉ. रसाळ यांनी 'सर्जन प्रेरणा आणि कवित्वशोध,' 'कवितेचा रूपशोध,' 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध,' 'आदिबंधात्मक समीक्षा,' 'दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र,' 'बालकवींचे काव्यविश्व' असे भरीव स्वरूपाचे समीक्षा लेखन केले आहे. अनुष्टुभ नियतकालिकाच्या जडणघडणीत त्यांचा सहभाग महत्त्वाचा होता. त्यांना साहित्य अकादमीसह अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 11-01-2020

तरूण भारत

# विद्यापीठात 'आपत्ती व्यवस्थापन, माध्यमांची जबाबदारी'वर कार्यशाळा

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोणत्याही आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रसारमाध्यमांचे काम अतिशय महत्वाचे ठरते. पूर्वतयारी, प्रतिसाद, पुनर्वसन कामांमध्ये प्रसार माध्यमांनी जलद, योग्य आणि अचूक माहिती प्रसारित केल्यामुळे आपत्ती व्यवस्थापनात आशादायी चित्र उभं राहते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले.

पत्रकार दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन आणि माध्यमांची जबाबदारी यावर सोमवारी कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी देसाई यांच्या हस्ते आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. यावेळी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ जय सामंत, पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, माजी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते. डॉ. निशा पवार संपादित 'वुमेन इन रिजनल टेलिव्हिजन चॅनल्स' ग्रंथाचा, 'संज्ञापक' रिसर्च जर्नलचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

जिल्हाधिकारी देसाई म्हणाले, नैसर्गिक, मानवनिर्मित असे आपतीचे प्रमुख प्रकार असले तरी सामाजिक आपतीचा प्रकारही पुढे येत आहे. कोल्हापूरमधील महापुरावेळी माध्यमांचे कौतुक करावे तितके थोडे आहे. लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे, सहभागी होण्याचे आणि मदत वाढवण्याच्या कामात प्रशासन यशस्वी झाले, ते केवळ माध्यमांच्या माध्यमातून! समाज माध्यमाच्या माध्यमातून दिवसभरात प्रशासनाकडून होणारी मदतीविषयीची माहिती सार्वत्रिक केली जात होती.



पर्यावरण तज्ज्ञ सामंत म्हणाले, माळीणसारखी भूस्खलनाची दुर्घटना असेल किंवा वाळवंटीकरण झपाट्याने वाढण्याची क्रिया असेल याबाबत मानवाने विचार करायला हवा. सध्या १३० कोटीच्या घरात लोकसंख्या असताना शेतजमिन, पाणी यांचं व्यस्त प्रमाण झाले आहे. धारणक्षमतेच्या बाहेर आपण जात आहोत. अशा स्थितीत जनजागृतीची मोठी जबाबदारी माध्यमांची आहे. जागतिक पातळीवर सर्वांनी एकत्र आलं पाहिजे. संदेशवहनमुळे आपत्ती काळात तोंड देऊ शकू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. जाधव यांनी स्वागत केले. डॉ. मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जाधव यांनी आभार मानले.